महाराष्ट्र शासन
महाराष्ट्र राज्य सामाईक प्रवेश परीक्षा (सीईटी) कक्ष
८ वा मजला, न्यु एक्सलसियर इमारत, ए.के. नायक मार्ग, फोर्ट, मुंबई - ४००००१.
दुरध्वनी : ०२२-२२०१६१५९ वेबसाईट : http://www.mahacet.org ई-मेल:cetcell@mahacet.org

क्र.तंशिप्र-१२२६/प्र.क्र. ०७/सीईटी/२०२६/२२११ दिनांक -०९.०९.२०२६

जाहीर सूचना

महाराष्ट्र राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षास उमेदवार/ पालक/ लोकप्रतिनिधी यांचे प्राप्त झालेल्या निवेदनांच्या अनुषंगाने अनेक संस्था अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांकडून अवाजवी नियमबाह्य शुल्क आकारत आहेत, अशा तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत.

संबंधित सर्वांना याद्वारे सूचित करण्यात येते की, शुल्क नियामक प्राधिकरण हे संपूर्ण संस्थेसाठी शुल्क मंजूर करते. शुल्क नियामक प्राधिकरणाने मंजूर केलेल्या शुल्काच्या व्यतिरीक्त अतिरिक्त शुल्क, रोखीने मागणी केलेले शुल्क इत्यादी घेणे बेकायदेशीर आणि पूर्णपणे प्रतिबंधित आहे.

सर्व संस्थांनी केवळ शिक्षण शुल्क प्राधिकरणाने मंजूर केलेले अचूक शुल्कच आकारणे बंधनकारक आहे, तसेच अधिकृत मंजुरी आदेश त्यांच्या सूचना फलकांवर आणि संकेतस्थळांवर प्रकाशित करणे आवश्यक आहे. कोणतीही संस्था मंजूर नसलेले नियमबाह्य शुल्क आकारताना आढळल्यास, त्यांच्यावर कडक कायदेशीर कारवाई केली जाईल आणि अशा संस्थांमधील नियमबाह्य प्रवेश रद्द करण्यात येतील, याची सर्व संबंधीत संस्थांनी नोंद घ्यावी.

सही/-
(दिलीप सरदेसाई, भा.प्र.से.)
महाराष्ट्र राज्य सामाईक प्रवेश परीक्षा
(सीईटी) कक्ष, मुंबई